DAY — 11 SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	25	1100	J-331	(M)

CO-OPERATION (53)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) डावीकडील अंक प्रश्न क्रमांक दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.

प्र. १. (अ) खालील दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) सभा तहकूब करण्याचा अधिकार ------ यांना आहे.

(अ) अध्यक्ष (ब) नाममात्र सभासद

(क) सचिव

(२) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर सहकारी संस्थांना सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मदतीमध्ये ----- करण्यात आली.

(अ) वाढ (ब) स्पर्धा

(क) कपात

(३) नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या ------ प्रती जोडाव्या लागतात.

(अ) दोन (ब) चार

(क) सहा

(४) भारतातील पहिला सहकारी संस्था कायदा ------ साली संमत करण्यात आला.

(अ) १९१२ (ब) १९०४

(क) १९२५

(५) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था ही ----- या ठिकाणी आहे.

(अ) पुणे (ब) नागपूर

(क) नवी दिल्ली

(ब) योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) मॅक्लेगन समिती अहवाल	(१) सहकारी संस्थेचे अस्तित्व
(ब) अंतिम सभा	(२) सहकारी संस्थेचा सेवक
(क) सचिव	(३) १९१५
(ड) ग्राहक	(४) सहकारी संस्थेचे सावकार
(इ) जिल्हा उपनिबंधक	(५) सहकारी संस्थेचा शेवट
	(६) राज्यस्तर
	(७) स्पर्धायुक्त बाजारपेठेचा राजा
	(८) १९५१
	(९) दुय्यम स्थान
	(१०) जिल्हा स्तर

(क) खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) सहकारी संस्थेच्या दृष्टीने हिशेबतपासणी महत्त्वाची असते.

(२) अवैधानिक पुस्तके तयार करणे कायद्याने बंधनकारक आहे.

(३) अध्यक्षांच्या गैरहजेरीत पदभार सचिव सांभाळतो.

(४) सहकारी पतपुरवठा रचना त्रिस्तरीय आहे.

(५) सहकारी संस्थेच्या आयुक्त व निबंधकाची नियुक्ती राज्य शासन करते.

(ड) एका वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्थेच्या स्थापनेचा प्रमुख हेतू कोणता?

(२) लाभांश म्हणजे काय?

(३) सभेची कार्यक्रमपत्रिका म्हणजे काय?

(४) तालुका पातळीवर सहकारी संस्थांचा प्रमुख नियंत्रक अधिकारी कोण असतो?

(५) निरंतर हिशेबतपासणी म्हणजे काय?

प्र. २. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : **[८]**

(१) व्यवस्थापन समिती

(२) नवीन आर्थिक धोरण

(३) नाममात्र सभासद

(४) लवाद

(५) खजिनदार

(६) सहकार प्रशिक्षण

प्र. ३. खालील विधानांबाबत स्वमत लिहा (कोणतेही दोन) : **[६]**

(१) नागरी सहकारी बँकेच्या कर्जपुरवठ्यामुळे स्वयंरोजगाराला चालना मिळते.

(२) सहकारी संस्था राखीव निधी उभारतात.

(३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वाढती थकबाकी ही गंभीर समस्या बनली आहे.

प्र. ४. फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) पहिली साधारण मंडळ सभा आणि अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा

(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक

(३) क्रियाशील सभासद आणि सहयोगी सभासद

(४) भाग आणि कर्जरोखे

प्र. ५. संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही दोन) : **[८]**

(१) सहकार आयुक्त व निबंधकांचे अधिकार

(२) सहकार चळवळी पुढील आव्हानांवरील उपाय

(३) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ

प्र. ६. कारणे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) नागरी सहकारी बँकेच्या कामकाजात अनेक समस्या असतात.

(२) सहकार आयुक्त व निबंधक हा कठोर प्रशासक असतो.

(३) अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार असतो.

(४) सभासदाला सहकारी संस्थेच्या एकूण भाग भांडवलाच्या १/५ पेक्षा जास्त रकमेचे भाग धारण करता येत नाही.

प्र. ७. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) नियोजित सहकारी संस्थेसाठी नाव राखून ठेवण्याबाबत निबंधकास विनंती करणारे पत्र लिहा.

(२) सहकारी संस्थेच्या सभासदत्वाचा अर्ज नामंजुरीबाबतचे पत्र लिहा.

(३) सहकारी संस्थेची वैधानिक पुस्तके कोणती?

प्र. ८. सहकारी संस्थेच्या सभासदांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या सविस्तरपणे स्पष्ट करा. **[८]**

किंवा

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील हिशेबतपासणीबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करा.

◆◆◆